झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरण

जा.क्र. झोपुप्रा/सहनि/कार्यासन-१/टे.सी.३/७८४/सन २०१५
सहकार कक्ष, झो.पु.प्रा., मुंबई
दिनांक : २७/०५/२०१५

परिपत्रक क्रमांक : १५१

विषय : झोपडपट्टी पुनर्वसन योजना स्विकारलेल्या नियोजित सहकारी गृहनिर्माण संस्थांचे कामकाजाच्या कार्यपध्दतीबाबत.

झोपडपट्टी पुनर्वसन योजनेचा प्रस्ताव नियोजित सहकारी गृहनिर्माण संस्थेमार्फत प्राधिकरणाकडे दाखल करण्यात येतो. सदरील नियोजित संस्थेचा पुनर्वसन योजनेचा प्रस्ताव प्राधिकरणाने स्विकारल्यानंतर संबंधीत सक्षम प्राधिकारी यांचेकडून नियोजित संस्थेच्या नावे परि-२ निर्गमित केले जाते. योजनेचे आशयपत्र निर्गमित करण्यापूर्वी प्राधिकरणाकडील प्रतिनिधीच्या उपस्थितीत पात्र झोपडीधारकांची सभा घेऊन नियोजित संस्थेच्या नावे बँकेत खाते उघडणे व संस्थेच्या नावे नाव राखून ठेवण्याच्या प्रस्तावास मंजूरी दिल्यानंतर संस्था नोंदणी केली जाते.

पुनर्वसन योजना स्विकारल्यानंतर आशयपत्र निर्गमित होईपर्यंत संबंधित झोपडीधारकांचे प्रतिनिधीत्व त्यांची नियोजित सहकारी गृहनिर्माण संस्था करीत असते. सदरील नियोजित सहकारी गृहनिर्माण संस्थेचे कामकाज कोणत्याही कायदा व नियमाअंतर्गत येत नसल्यामूळे त्यावर कोणत्याही प्रकारचे नियंत्रण ठेवता येत नाही. योजनेच्या प्रगतीबाबतची माहिती सर्व झोपडीधारकांना न मिळाल्याने भुखंडावरील झोपडीधारकांमध्ये अंतर्गत वाद निर्माण होत आहेत. याबाबतच्या तक्रारी प्राधिकरणाकडे मोठया प्रमाणावर प्राप्त होतात. त्याशिवाय एकाच भूखंडावरील नियोजित संस्थेमध्ये दोन गटांची निर्मीती होऊन दोन्ही गट स्वतंत्र व्यवस्थापक समितीची स्थापना करु इच्छितात. उपरोक्त वादांमूळे झोपडीधारकांत योजनेच्या कामकाजाबाबत संभ्रम निर्माण होऊन, पर्यायाने योजनेच्या विकासाच्या कामकाजामध्ये अडथळे निर्माण होतात.

प्रशासकिय इमारत, अनंत काणेकर मार्ग, बांद्रा (पुर्व) मुंबई - ४०००५१
दुरध्वनी क्र. २६५६५८००/२६५९०४०५/१८७९, फॅक्स क्र. ९१-२२-२६५९०४५७. संकेतस्थळ: www.sra.gov.in ई-मेल : info@sra.gov.in

यामूळे नियोजित संस्थेचे कामकाज सुरळीतपणे पार पडणेसाठी व पुनर्वसन योजनेमध्ये कोणत्याही प्रकारचे अडथळे निर्माण होऊ नयेत याकरीता नियोजित संस्थेचे मुख्यप्रवर्तक व इतर प्रवर्तक मंडळाची निवड व त्या संदर्भातील तक्रारी यांचा निपटारा करणेसाठी खालीलप्रमाणे कार्यपध्दती निश्चित करण्यात येत आहे.

१) पुनर्वसन योजना दाखल करतेवेळी नियोजित संस्थेच्या सर्वसाधारण सभेमध्ये ज्या मुख्यप्रवर्तक व इतर प्रवर्तक यांची निवड झालेली आहे त्या प्रवर्तक मंडळाने दरवर्षी त्यांची सहकारी गृहनिर्माण संस्था नोंदणी होइपर्यंत माहे ३० सप्टेंबर पूर्वी भूखंडावरील योजनेत समाविष्ट झालेल्या झोपडीधारकांची सर्वसाधारण सभा बोलाविणे आवश्यक राहील.

२) सदरील सर्वसाधारण सभा योजनेच्या भूखंडावर अथवा नजीकच्या परिसरात आयोजित करण्यात यावी तसेच सभेची नोटीस प्रारुप परि-२ मधील सर्व झोपडीधारकांना सभेच्या दिनांकाच्या सात दिवस अगोदर देण्यात यावी. व सभेस नियो. संस्थेच्या प्रारुप परि-२ मध्ये नाव समाविष्ट असणाऱ्या झोपडीतील एका व्यक्तीस (पती अथवा पत्नी) यांस प्रवेश देण्यात यावा.

३) सदरील सभेत सभेच्या विषयपत्रिकेवर खालील विषय अनिवार्यपणे ठेवण्यात यावेत.

विषय क्र. ०१ : संस्थेच्या पुनर्वसन योजनेच्या कामकाजाची माहिती झोपडीधारकांना देणे व योजने संबंधातील अडी व अडचणींवर चर्चा करणे.

विषय क्र.०२ : नियोजित संस्थेचे मुख्य प्रवर्तक व इतर प्रवर्तक मंडळाची पुढील वर्षासाठी नियुक्ती करणे.

याशिवाय अन्य काही विषय आवश्यक असल्यास त्याबाबतचा निर्णय संस्था स्तरावर घेण्यात यावा.

४) सर्वसाधारण सभेची उपस्थिती बायोमॅट्रीक पध्दतीने नोंदविण्यात यावी व सर्वसाधारण सभेच्या कामकाजाचे संपूर्ण व्हिडीओ चित्रीकरण करावे.

५) सर्वसाधारण सभेचे इतिवृत्त, व्हिडीओ सी.डी. सह सभेच्या दिनांकापासून ३० दिवसांचे आत प्राधिकरणाकडे सादर करावे त्याशिवाय इतिवृत्त संस्थेच्या कार्यालयात नोटीस बोर्डवर लावण्यात यावे.

६) नियोजित संस्थेने ३० सप्टेंबर पर्यंत सर्वसाधारण सभेचे आयोजन न केल्यास प्राधिकरणाकडील परिपत्रक क्र. १४८ मधील नमूद कार्यपध्दतीनुसार सभेचे आयोजन सहकार कक्षामार्फत करण्यात येईल.

७) नियोजित गृहनिर्माण संस्थेच्या योजनेची कामकाज, विकासक यांबाबत प्राप्त होणाऱ्या कोणत्याही तक्रारी व झोपडीधारकांची बाजू उपरोक्त प्रमाणे सर्वसाधारण सभेत नियुक्त केलेले मुख्य प्रवर्तक व इतर प्रवर्तक

प्रशासकिय इमारत, अनंत काणेकर मार्ग, बांद्रा (पुर्व) मुंबई - ४०००५१
दुरध्वनी क्र. २६५६५८००/२६५९०४०५/१८७९, फॅक्स क्र. ९१-२२-२६५९०४५७, संकेतस्थळ: www.sra.gov.in ई-मेल : info@sra.gov.in

यांच्यामार्फत ऐकून घेण्यात येईल.

८) सर्वसाधारण सभेत निवडण्यात आलेले मुख्य प्रवर्तक व इतर प्रवर्तक यांचे शिवाय योजनेतील इतर नावाने अथवा त्याच नावाने असणाऱ्या दुसऱ्या प्रवर्तक मंडळाकडून प्राप्त होणाऱ्या कोणत्याही अर्जाची दखल घेता येणार नाही.

९) सदरील सभेचे आयोजन, व मुख्य प्रवर्तक व इतर प्रवर्तक यांचे सर्वसाधारण सभेतील निवडीबाबत काही तक्रार प्राप्त झाल्यास संस्थेने सादर केलेले इतिवृत्त व व्हिडीओ सी.डी. तपासून याबाबत सहकार कक्षाने सदरील अर्जावर निर्णय घ्यावा.

मुख्य कार्यकारी अधिकारी,
झो.पु.प्रा., मुंबई

प्रशासकिय इमारत, अनंत काणेकर मार्ग, बांद्रा (पुर्व) मुंबई - ४०००५१
दुरध्वनी क्र. २६५६५८००/२६५९०४०५/१८७९, फॅक्स क्र. ९१-२२-२६५९०४५७. संकेतस्थळ: www.sra.gov.in ई-मेल : info@sra.gov.in